सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे •अंक २७९ • मंगळवार दि.४ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## शिक्षणमहर्षी पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील यांचे निधन



कोल्हापूर:शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवा शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणारे तसेच त्रिपुरा, बिहार आणि पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंत (डी. वाय.) पाटील यांचे मंगळवारी कोल्हापुरात वयाच्या ९१व्या वर्षी निधन झाले. गेल्या काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती खालावत होती.

शेतकरी कुटुंबातून पुढे येत त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे कार्य उभारले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तीन डीम्ड विद्यापीठांसह १८० हून अधिक शैक्षणिक संस्था कार्यरत असून लाखो विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला आहे. त्यांनी कोल्हापूरचे महापौर, आमदार म्हणूनही काम पाहिले. शिक्षण व समाजसेवेतील योगदानाबद्दल त्यांना १९९१ मध्ये 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले होते.त्यांचे पार्थिव बुधवारी (५ ऑगस्ट) सकाळी ११ ते सायं.४ वाजेपर्यंत कसबा बावडा येथील 'यशवंत निवास' येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार असून, सायं.५ वा. शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# किनवटला जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सात निर्णय



मुंबई/प्रतिनिधी- नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, सरकारी वकील कार्यालय तसेच वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यासोबतच राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत सात निर्णयांना मंजुरी देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयानुसार नव्या न्यायालयांसाठी आवश्यक न्यायिक अधिकारी, कर्मचारी पदनिर्मिती तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या तरतुदीलाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे किनवटसह महूर, हिमायतनगर आणि आसपासच्या आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही. स्थानिक स्तरावर न्यायव्यवस्था उपलब्ध झाल्याने नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठी बचत होणार आहे.याशिवाय मंत्रिमंडळाने राज्यातील विविध विभागांशी संबंधित आणखी काही महत्त्वाचे निर्णयही घेतले. मुंबई शहरातील सर्व शासकीय कार्यालये व मुंबई महानगरपालिकेच्या वीज देयकांचे बेस्ट उपक्रमाच्या संयुक्त बिलिंग प्रणालीद्वारे केंद्रीकृत पद्धतीने भरणा करण्याच्या प्रशासकीय सुधारणेला मंजुरी देण्यात आली.महाराष्ट्र राज्य माहिती आयोगात राज्य माहिती आयुक्तांची तीन नवीन पदे निर्माण करण्यास तसेच त्यासाठी आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली. विधी व न्याय विभागांतर्गत सिल्लोड (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि सरकारी वकील कार्यालय, चांदवड (जि. नाशिक) येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, केज (जि. बीड) येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय पान ४ वर

# आंतरराष्ट्रीय तिरंदाजीत किनवटचा डंका

## ज्ञानेश चेरलेने सुवर्णपदकासह,रौप्यपदकही पटकावले




किनवट/प्रतिनिधी- स्थानिक सरस्वती विद्यामंदिर महाविद्यालयातील इयत्ता बारावीतील विद्यार्थी ज्ञानेश सौ.धनरेखा बालाजी चेरलेंनी ३० जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान ढाका (बांगलादेश) येथे वर्ल्ड आर्चरी असोसिएशन तर्फे आयोजित केलेल्या प्रेसिडेंट चॅलेंज कप ॅड एशिया जॉईंट ट्रेनिंग कॅम्प (recident challenge cup Asia joint training camp) मध्ये १८ वर्षीय पुरुष गटातून अंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत सहभाग घेऊन वैयक्तिक श्रेणीतून सुवर्ण पदक पटकावले. शिवाय मिक्स्ड टीम प्रकारात सुद्धा रौप्य पदकाचे प्राविण्य मिळवून जगाच्या पटलावर भारतीय तिरंगाची मान उंचावली. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयासह सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.


ज्ञानेशची आई सौ.धनरेखा आणि वडील बालाजी चेरले हे दोघेही शिक्षक आहेत हे विशेष. बांगलादेशाची राजधानी असलेल्या ढाका येथे ३० जुलै ते २ ऑगस्ट २०२६ दरम्यान आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धा पार पडल्या. १८ वर्ष वयोगटातील वैयक्तिक प्रकारात तिरंदाजी स्पर्धेत किनवटच्या ज्ञानेश चेरलेने सहभागी होऊन दमदार यश मिळवून सुवर्ण पदक पटकावले. तदोपरांत मिक्स टीममध्ये सुद्धा सहभाग घेऊन मिक्स पान ४ वर

# 'गुंगी गुडिया'वादावरुन काँग्रेस-राष्ट्रवादी आमनेसामने

## काँग्रेस कार्यालयात घुसून राष्ट्रवादीची घोषणाबाजी

मुंबई/प्रतिनिधी-उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसने सोशल मीडियावर केलेल्या 'गुंगी गुडिया' या उल्लेखाचे तीव्र पडसाद राज्यभर उमटू लागले आहेत. या वादाने मंगळवारी नाट्यमय वळण घेतले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे नेते सूरज चव्हाण कार्यकर्त्यांसह थेट काँग्रेसच्या कार्यालयात घुसले. जोरदार घोषणाबाजी करत त्यांनी काँग्रेसविरोधात आक्रमक भूमिका घेत सुनेत्रा पवारांची जाहीर माफी मागण्याची मागणी केली.


राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बीड दौऱ्यातील एका कार्यक्रमाचा व्हिडिओ शेअर करत काँग्रेसने सुनेत्रा पवार अजून किती दिवस 'गुंगी गुडिया' बनून राहणार? असा सवाल उपस्थित केला होता. यावरुन काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील राजकीय वाद चांगलाच उफाळून आला आहे. आज मुंबईतील काँग्रेस भवनात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या पत्रकार परिषदेत रा.काँ.चे सुरज चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रवेश करत काँग्रेसने माफी मागावी अशा घोषणा दिल्या. अचानक झालेल्या या घुसखोरीमुळे काँग्रेस कार्यालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. कार्यकर्त्यांनी महिलांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसचा निषेध असो अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. सूरज चव्हाण यांनी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना थेट जाब विचारण्याचा प्रयत्न करत, आता महाराष्ट्रातील प्रत्येक काँग्रेस कार्यालयात जाऊन याचा हिशेब विचारू, असा इशारा दिला. चव्हाण म्हणाले, सुनेत्रा पवार यांना 'गुंगी गुडिया' म्हणणे हा केवळ राजकीय आरोप नसून महिलांचा अवमान आहे. काँग्रेसची वैचारिक दिवाळखोरी यामुळे उघड झाली आहे. महिलांना कमी लेखण्याची काँग्रेसची मानसिकता महाराष्ट्र सहन करणार नाही. या वादाची ठिणगी काँग्रेसच्या सोशल मीडिया पोस्टमुळे पडली. या पोस्टनंतर राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र आक्षेप घेत काँग्रेसवर महिलांचा अपमान केल्याचा आरोप केला.या वादात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही उडी घेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. सुनेत्रा वहिनींबद्दल अशी भाषा वापरताना काँग्रेसने मनाची नाही तर जनाची तरी लाज बाळगायला हवी होती, असा टोला त्यांनी लगावला.सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही काँग्रेसच्या शब्दप्रयोगाचा निषेध केला. राजकीय मतभेद असू शकतात, मात्र महिलांचा अवमान करणारी भाषा कोणत्याही पान ४ वर




मागील काही दिवसांपासून राज्यातील विविध भागात पावसाने जोरदार हजेरी लावली असून गोदावरीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याचे पहावयास मिळत असून विष्णुपुरी येथे असलेल्या कै.डॉ.शंकरराव चव्हाण जलाशयात मुबलक प्रमाणात पाणीसाठा झाल्याने नांदेडकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

# कत्तलीसाठी गोवंश घेवून जाणारे दोन वाहन पोलीसांनी पकडले

## ३१ लाख रुपयांचा ऐवज जप्त



नांदेड/प्रतिनिधी-दोन वाहनात गोवंश डांबून कत्तलीसाठी घेवून जात असतांना सोमवारी पहाटे मालेगाव परिसरात पोलीसांनी सापळा रचून पकडले आहे.

बोलेरो पिकअप वाहनामधून गोवंश कत्तलीसाठी घेवून जात असल्याची माहिती अर्धापूर पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली अर्धापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक महादेव मांजरमकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी पहाटे मालेगाव येथील शिवाजी चौकात सापळा रचून बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच २६ बीई-७६५७ व बोलेरो पिकअप क्र.एमएच २६ सीएच-२६२८ हे दोन वाहन पकडले. पोलीसांनी दोन्ही वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये दहा जनावरे अत्यंत निर्दयपणे दोरीने बांधुन ठेवल्याचे आढळून आले. तसेच पोलीसांनी पिकअप वाहनासोबत टेहळली करणारे दोन कार जप्त केले आहेत. पोलीसांनी दहा गोवंशाची सुटका केली. दोन बोलेरो पिकअप वाहन, दोन चारचाकी वाहन, दहा गोवंश जनावरे, आठ मोबाईल इतर साहित्य असा ३१ लाख ५१ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीसांनी शेख माजीद शेख आरीफ (वय ३९) रा.मदिनानगर, अर्धापूर, मिरसाब अब्दुल शेख (वय ३१) रा.खुदबेनगर देगलूरनाका, नांदेड, शेख सोहेल शेख नसीर (वय २५) रा. मदिनानगर, अर्धापूर, उमर सलिम कुरेशी (वय २७) रा.वांगी रोड, परभणी, सय्यद शाहबाज स.रहेबर (वय २४) रा. मदिनानगर, परभणी, मो.रिजवान अब्दुल रहेमान (वय २९) रा.खुदबेनगर, देगलूरनाका, नांदेड, मो.शाहबाज मो.जाफर कुरेशी (वय १९) रा. खुदबेनगर, देगलूरनाका, नांदेड, अब्दुल फैजान अ.खय्युम कुरेशी (वय २०) रा.इकबालनगर, देगलूरनाका, नांदेड यांना अटक केली असून त्यांच्या विरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या बदलीविरोधात पोलीस ठाण्यासमोर तीव्र आंदोलन



धर्माबाद/प्रतिनिधी- धर्माबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या मुदतपूर्व बदलीच्या निषेधार्थ सोमवारी (३ ऑगस्ट) रात्री शहरातील नागरिक, विविध समाजांचे प्रतिनिधी, व्यापारी, तरुण आणि सामाजिक संघटनांनी पोलीस ठाण्यासमोर जोरदार ठिय्या आंदोलन केले. सदाशिव भडीकर यांची बदली रद्द करा, प्रशासनाचा निषेध असो अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

आंदोलनकर्त्यांनी पोलीस ठाण्याच्या आवारात ठिय्या देत भडीकर यांच्या बदलीचा तीव्र निषेध नोंदवला. धर्माबादमध्ये पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस निरीक्षक भडीकर यांनी कायदा व सुव्यवस्था सक्षमपणे राखण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि सराव परीक्षा यांसारखे उपक्रम राबवून वेगळी ओळख निर्माण केली होती. तसेच अवैध धंदे, गुन्हेगारी आणि समाजकंटकांविरोधात कठोर कारवाई करून सर्वसामान्य नागरिक, महिला आणि वंचित घटकांच्या तक्रारींना तत्परतेने न्याय देण्याचे काम त्यांनी केले, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी नागरिकांनी आरोप केला की, प्रामाणिक आणि निर्भीडपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्याला काही हितसंबंधी अवैध व्यावसायिक आणि राजकीय दबावामुळे लक्ष्य करण्यात आले असून, त्यातूनच ही मुदतपूर्व बदली करण्यात आली आहे. कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याला राजकीय बळी देण्याचा प्रयत्न होत पान ४ वर



## जनमत बदलाचे संकेत?

**लोकशाहीत पोटनिवडणुकीचे निकाल केवळ एका जागेपुरते मर्यादित नसतात. ते सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करतात, विरोधकांना नवी ऊर्जा देतात आणि मतदारांच्या मनातील बदलत्या भावना अधोरेखित करतात. बिहार, गुजरात आणि मध्य प्रदेशातील नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकांच्या निकालांकडे याच दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. या निकालांमध्ये भाजप, काँग्रेस आणि जनसुराज पक्षाला प्रत्येकी एक जागा मिळाली असली, तरी सर्वाधिक चर्चा बिहारमधील निकालाची होत आहे.बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) स्पष्ट बहुमत आहे. गेली सुमारे ३५ वर्षे संबंधित मतदारसंघ हा भाजपचा अभेद्य गड मानला जात होता. एवढेच नव्हे, तर हा मतदारसंघ भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या राजकीय परंपरेशी जोडला गेलेला, पक्षासाठी प्रतिष्ठेचा आणि वडिलोपार्जित राजकीय प्रभाव असलेला मतदारसंघ मानला जातो. अशा ठिकाणी प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाने विजय मिळवून भाजपच्या अभेद्य किल्ल्यालाच हादरा दिला आहे. त्यामुळे हा निकाल भाजपसाठी चिंतनाचा विषय ठरणे स्वाभाविक आहे.या पराभवाचे महत्त्व केवळ एका जागेच्या गमावण्यात नाही. लोकसभेत भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीला स्पष्ट बहुमत आहे, बिहारमध्येही सत्ताधारी आघाडी मजबूत आहे, तरीही मतदारांनी पर्याय स्वीकारण्याची तयारी दाखवली. याचा अर्थ असा की, केवळ सत्तेची ताकद किंवा संघटनात्मक बळ हे विजयाचे कायमस्वरूपी सूत्र राहिलेले नाही. मतदार आता प्रत्येक निवडणुकीत नव्याने निर्णय घेत आहे.प्रशांत किशोर यांचा विजय हा केवळ एका उमेदवाराचा किंवा एका पक्षाचा विजय नाही; तो पर्यायाच्या शोधात असलेल्या मतदारांच्या मानसिकतेचे प्रतिबिंब मानता येईल. गेल्या काही वर्षांत त्यांनी पारंपरिक राजकारणावर सातत्याने टीका करत पर्यायी राजकारणाची भूमिका मांडली. या भूमिकेला मतदारांनी काही प्रमाणात स्वीकारल्याचे या निकालातून दिसते. अर्थात, एका विजयावरून मोठे राजकीय निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही; मात्र मतदार नव्याचा शोध घेत असल्याचा संदेश या निकालातून नक्कीच मिळतो.विरोधी पक्षांसाठी हा निकाल निश्चितच जमेची बाजू आहे. भाजप अजिंक्य नाही, हा संदेश या निकालाने दिला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये विरोधकांचा आत्मविश्वास वाढण्याची शक्यता आहे. मात्र या यशावर समाधान मानण्याऐवजी त्यांनी सक्षम नेतृत्व, स्पष्ट धोरणे आणि जनतेशी सातत्यपूर्ण संवाद यावर भर देणे आवश्यक आहे. केवळ सत्ताविरोधी भावना पुरेशा नसतात; विश्वासार्ह पर्याय उभा करणेही तितकेच महत्त्वाचे असते.भाजपनेही या निकालाकडे केवळ अपवाद म्हणून पाहण्याची चूक करू नये. स्थानिक नाराजी, उमेदवारांची निवड, संघटनात्मक कमतरता किंवा जनतेच्या अपेक्षांमधील बदल यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्याची ही वेळ आहे. निवडणूक जिंकण्यासाठी केवळ भूतकाळातील यश पुरेसे नसते; प्रत्येक निवडणूक नव्या विश्वासाची परीक्षा असते. गुजरातमध्ये भाजपने आपला मतदारसंघ कायम राखला आणि मध्य प्रदेशात काँग्रेसने विजय मिळविला. त्यामुळे कोणत्याही एका पक्षाला या निकालांवरून संपूर्ण देशाचे राजकारण ठरविता येणार नाही. तरीही बिहारचा निकाल सर्वाधिक बोलका आहे. तो मतदारांच्या बदलत्या मानसिकतेचा आणि नव्या पर्यायांकडे पाहण्याच्या तयारीचा संकेत देतो.लोकशाहीत मतदार हा अंतिम निर्णायक असतो. तो कोणत्याही पक्षाला कायमस्वरूपी सत्तेचा परवाना देत नाही. कामगिरी, विश्वासार्हता आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्तता यावरच त्याचा कौल ठरत असतो. बिहारच्या पोटनिवडणुकीने पुन्हा एकदा हेच सिद्ध केले आहे की, कितीही अभेद्य वाटणारा राजकीय किल्ला असला तरी जनतेने बदलाचा निर्णय घेतला तर त्याला तडा जाण्यास वेळ लागत नाही.त्यामुळे हा निकाल केवळ एका मतदारसंघाचा नसून भारतीय लोकशाहीतील बदलत्या जनमताचा महत्त्वपूर्ण संदेश मानावा लागेल.**

# जातीविरहित मतदानाची अपेक्षा आणि ग्रामीण वास्तव



लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नसून ती समाजाच्या विचारांची, मूल्यांची आणि प्रगल्भतेची कसोटी असते. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी आपण विकासाच्या मुद्द्यावर मतदान व्हावे, जाती-धर्मापलीकडे जाऊन मतदारांनी निर्णय घ्यावा अशा घोषणा ऐकतो. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे पाहिले, तर वेगळेच चित्र दिसून येते. विशेषतः जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये जातीचे गणित आजही प्रभावी आहे. त्यामुळे जातीविरहित मतदान होईल अशी अपेक्षा वास्तवाशी फारशी जुळत नाही.

जिल्हा परिषद निवडणूक ही लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीसारखी केवळ पक्षीय विचारसरणीवर आधारित नसते. या निवडणुकीत मतदार आपल्या दैनंदिन आयुष्यात ज्यांच्याशी संबंध येतात, अशा व्यक्तींना मतदान करतात. गावातील सामाजिक संबंध, नातेसंबंध, जातीचे समीकरण, आर्थिक व्यवहार, परस्पर मदत, प्रतिष्ठा आणि स्थानिक प्रभाव या सर्व गोष्टी मतदानाच्या निर्णयावर परिणाम करतात. त्यामुळे पक्षापेक्षा उमेदवाराची जात, त्याचे गावातील स्थान आणि त्याची सामाजिक पकड याला अधिक महत्त्व मिळते.गावात एखाद्या विशिष्ट जातीची संख्या मोठी असेल, तर त्या समाजाचा उमेदवार नैसर्गिकरीत्या आघाडीवर असतो. अनेकदा मतदार विकासाच्या प्रश्नांपेक्षा आपला माणूस निवडून यावा, या भावनेने मतदान करतात. हे वास्तव नाकारून चालणार नाही. प्रत्येक समाजाला स्वतःचा नेता हवा आहे, स्वतःचे प्रतिनिधित्व हवे आहे आणि निर्णय प्रक्रियेत स्वतःचा आवाज हवा आहे. त्यामुळे जातीच्या आधारावर मतदान होण्याची शक्यता आजही मोठ्या प्रमाणात आहे.

गेल्या काही वर्षांत ग्रामीण समाजात एक मोठा बदल झाला आहे. प्रत्येक समाजात स्वाभिमानाची भावना जागी झाली आहे. विविध समाजातील तरुण शिक्षण घेत आहेत, स्पर्धा परीक्षा देत आहेत, सामाजिक कार्यात सहभागी होत आहेत आणि राजकारणातही पुढे येत आहेत. त्यामुळे प्रत्येक जातीतून नेतृत्व निर्माण होत आहे. हा बदल सकारात्मक असला, तरी त्याचा परिणाम मतदानाच्या पद्धतीवरही होत आहे. प्रत्येक समाज आपल्या तरुण नेतृत्वामागे उभा राहण्याचा प्रयत्न करतो.पूर्वी गावातील राजकारण काही मोजक्या घराण्यांपुरते मर्यादित होते. आता परिस्थिती बदलत आहे. गावातील वजनदार, अभ्यासू, लोकांमध्ये मिसळणारा आणि काम करणारा तरुण लोकांसमोर पर्याय म्हणून उभा राहत आहे. त्यामुळे पारंपरिक नेत्यांसमोर नवे आव्हान निर्माण झाले आहे. मात्र, या नव्या नेतृत्वालाही जातीच्या चौकटीतून बाहेर पडणे कठीण जात आहे.

राजकीय पक्ष कितीही मेहनत घेत असले, प्रचारासाठी मोठ्या सभा घेत असले, नामांकित नेत्यांना आणत असले किंवा मोठा खर्च करत असले, तरी स्थानिक निवडणुकीत त्याचा अपेक्षित परिणाम होईलच असे नाही. कारण मतदार आता पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. आजचा मतदार अधिक जागरूक आहे. तो केवळ भाषणांनी प्रभावित होत नाही. तो उमेदवाराचा भूतकाळ, वर्तन, कामाची पद्धत, समाजातील प्रतिमा आणि त्याचे खरे संबंध तपासतो.आज माहितीचे युग आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, यूट्यूब, फेसबुक, व्हॉट्सॲप यामुळे गावातील सामान्य माणसालाही राजकारणातील घडामोडी समजू लागल्या आहेत. पूर्वी एखादी राजकीय घटना शहरापुरती मर्यादित राहत असे; आता काही मिनिटांत ती गावागावात पोहोचते. कोण कोणाच्या विरोधात बोलते, कोण कोणाबरोबर जाते, कोण पक्ष बदलतो, कोणाची कोणाशी सलगी आहे, कोणाचा कोणाशी संघर्ष आहेही सर्व माहिती आता गावातील महिलांनाही आणि युवकांनाही सहज उपलब्ध होते.

ग्रामीण भागातील महिलांना पूर्वी राजकारणाची माहिती कमी असते, अशी धारणा होती. पण आज ती परिस्थिती बदलली आहे. महिलाही बातम्या पाहतात, मोबाईल वापरतात, व्हिडिओ पाहतात आणि स्वतःचे मत तयार करतात. त्यामुळे त्यांनाही राजकीय घडामोडींची माहिती असते. तरीही मतदानाच्या वेळी अनेकदा जात, नातेसंबंध आणि स्थानिक दबाव यांचा प्रभाव दिसून येतो.मतदानापूर्वी अनेक उमेदवार गावोगावी फिरतात. सभा घेतात, संमेलने भरवतात, मोर्चांत सहभागी होतात, धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहतात आणि प्रत्येक समाजाशी जवळीक वाढवण्याचा प्रयत्न करतात. काही दिवस सर्वांच्या सुख-दुःखात सहभागी झाल्यासारखे वातावरण तयार केले जाते. मात्र मतदानाच्या दिवशी मतदाराच्या मनात शेवटी आपला समाज हा विचार अधिक प्रभावी ठरतो. त्यामुळे बाहेरून सर्वांना सोबत घेणारा मतदार मतदान करताना जातीचा विचार करतो, हे वास्तव अनेक निवडणुकांनी दाखवून दिले आहे.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

ग्रामीण भागात पैशाचा प्रभावही वाढत चालला आहे. निवडणुकीच्या काळात विविध प्रकारे मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न होतो. काही ठिकाणी मेजवान्या, काही ठिकाणी मद्यपान, काही ठिकाणी आर्थिक मदत, तर काही ठिकाणी विविध स्वरूपातील प्रलोभने दिली जातात. हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. पैशाचा वापर आणि जातीचे गणित यांचा संगम झाला की निवडणूक अधिकच विकृत स्वरूप धारण करते.काही मतदार पैसे स्वीकारतात; मात्र मतदान मात्र आपल्या समाजातील उमेदवारालाच करतात. त्यामुळे पैसा खर्च करणाऱ्या उमेदवारालाही अपेक्षित परिणाम मिळेलच असे नाही. पैशापेक्षा जातीची निष्ठा अनेक ठिकाणी अधिक मजबूत असल्याचे दिसून येते. हे वास्तव राजकीय पक्षांनाही माहीत आहे आणि म्हणूनच उमेदवारी देताना सर्वप्रथम जातीय समीकरणांचा विचार केला जातो.प्रचाराच्या काळात अफवा पसरवणे, खोट्या बातम्या तयार करणे, विरोधकांविषयी संशय निर्माण करणे, सोशल मीडियावर चुकीची माहिती प्रसारित करणे, बनावट संदेश व्हायरल करणे, मतदानाच्या आधी वातावरण बदलण्याचा प्रयत्न करणेहे प्रकारही वाढत आहेत. काही वेळा धार्मिक भावना, काही वेळा जातीचा अभिमान, तर काही वेळा स्थानिक वाद उकरून काढून मतदारांमध्ये फूट पाडली जाते.

काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या एका चित्रपटात सत्तेसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध राजकीय डावपेचांचे चित्रण करण्यात आले होते. त्या कथानकातील अनेक गोष्टी आजच्या वास्तवाशी साधर्म्य दाखवतात. प्रचारयंत्रणा, अफवा, धार्मिक प्रतीकांचा वापर, शेवटच्या क्षणी वातावरण बदलणे, प्रशासनावर दबाव, मतदारांची दिशाभूल; हे सर्व प्रकार आज विविध स्वरूपात पाहायला मिळतात.प्रचारकाळात देव, धर्म, संत-महंत, महाराज, आशीर्वाद, यात्रा, उत्सव यांचाही राजकीय उपयोग केला जातो. समाजभावना जागृत करण्याऐवजी त्यांचा मतांसाठी वापर होतो. निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर लढली जाण्याऐवजी भावनिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.निवडणूक आयोग आणि प्रशासन निष्पक्षपणे काम करत असले, तरी अनेकदा मनुष्यबळाची कमतरता, मोठे भौगोलिक क्षेत्र, अफवांचा वेग आणि सोशल मीडियाचा प्रभाव यामुळे सर्वत्र प्रभावी नियंत्रण ठेवणे अवघड होते. त्यामुळे मतदारांनी स्वतः जागरूक राहणे अधिक महत्त्वाचे ठरते.

ग्रामीण भागातील अनेक मूलभूत प्रश्न वर्षानुवर्षे तसेच आहेत. तेच रस्ते पुन्हा पुन्हा दुरुस्त होतात. त्याच पाण्याच्या योजना नव्याने जाहीर होतात. त्याच विकासकामांचे भूमिपूजन अनेकदा होते. प्रत्येक निवडणुकीत विकासाच्या मोठ्या घोषणा होतात; पण प्रत्यक्षात बदल अपेक्षित वेगाने होत नाही. त्यामुळे मतदारांमध्ये नाराजी वाढते.दुष्काळ, अतिवृष्टी, शेतीचे नुकसान, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, सिंचन, रस्ते, ग्रामविकास यांसारखे प्रश्न कायम असतानाही निवडणूक प्रचारात त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. जातीचे गणित आणि राजकीय समीकरणे यांनाच जास्त महत्त्व दिले जाते. ही परिस्थिती बदलली नाही, तर ग्रामीण विकासाचा वेगही मर्यादित राहील.बहुमत कोणालाही स्पष्ट मिळणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली तर निवडणुकीपूर्वी एकमेकांवर टीका करणारे नेते निवडणुकीनंतर एकत्र येतात. प्रचारात कट्टर विरोधक असलेले नेते सत्तेसाठी हातमिळवणी करतात. त्यामुळे मतदारांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आणि निवडणुकीनंतरची राजकीय समीकरणे यात मोठी तफावत दिसते.

यामुळे मतदारांमध्ये राजकारणाविषयी अविश्वास वाढतो. प्रचारात एकमेकांवर गंभीर आरोप करणारे नेते सत्तेसाठी एकत्र येतात, तर सामान्य मतदार मात्र गावात कायमस्वरूपी विभागला जातो. निवडणूक संपली तरी गावातील वैर संपत नाही. उलट अनेक ठिकाणी सामाजिक दुरावा वाढतो. ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे.निवडणुकीच्या काळात गावोगावी मोठमोठे बॅनर लागतात. प्रत्येक चौकात उमेदवारांचे फोटो दिसतात. काही उमेदवारांवर गंभीर गुन्हे दाखल असतानाही त्यांना समाजातील पाठिंबा मिळतो. चारित्र्य, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि विकासाची दृष्टी यापेक्षा जात, पैसा आणि प्रभाव यांना अधिक महत्त्व दिले जाते, ही चिंतेची बाब आहे.मतदारांनी उमेदवार निवडताना त्याचा समाजासाठी केलेला संघर्ष, सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा, भ्रष्टाचारावरील भूमिका, विकासकामांची क्षमता, शिक्षण, संवादकौशल्य आणि लोकांशी असलेले नाते या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. केवळ जातीच्या आधारावर प्रतिनिधी निवडल्यास समाजाच्या दीर्घकालीन विकासाला मर्यादा येऊ शकतात.

याचा अर्थ असा नाही की प्रत्येक ठिकाणी सर्वच मतदार जातीवर मतदान करतात. अनेक ठिकाणी विकास, कामगिरी आणि प्रामाणिक नेतृत्वाला मतदारांनी पसंती दिली आहे. परंतु एकूण ग्रामीण सामाजिक रचना पाहता जातीचा प्रभाव अद्यापही मोठ्या प्रमाणात कायम आहे, हे नाकारता येत नाही.जातीविरहित मतदान ही लोकशाहीची आदर्श संकल्पना आहे; पण त्या दिशेने जाण्यासाठी समाजात शिक्षण, सामाजिक समता, आर्थिक स्वावलंबन, राजकीय जागरूकता आणि नैतिक नेतृत्व यांची आवश्यकता आहे. केवळ घोषणांनी किंवा भाषणांनी जातीय राजकारण संपणार नाही. मतदारांच्या विचारात बदल झाला, तरच निवडणुकीचे स्वरूप बदलेल.आज गरज आहे ती गावागावात विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याची. पाणी, शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी संधी, डिजिटल सुविधा आणि पारदर्शक प्रशासन यावर मतदान झाले पाहिजे. समाजाचे प्रतिनिधित्व महत्त्वाचे आहे; परंतु ते विकासाशी जोडले गेले पाहिजे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, सध्याच्या परिस्थितीत जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये पूर्णपणे जातीविरहित मतदान होईल, अशी अपेक्षा वास्तववादी वाटत नाही. जात, पैसा, स्थानिक समीकरणे, सामाजिक प्रभाव आणि राजकीय व्यवहार यांचा मोठा प्रभाव कायम राहणार आहे. मात्र त्याचबरोबर मतदार अधिक जागरूक होत आहेत, प्रश्न विचारू लागले आहेत आणि नेत्यांची कसून परीक्षा घेऊ लागले आहेत. हीच लोकशाहीसाठी आशेची किरण आहे. ज्या दिवशी मतदार माझी जात यापेक्षा माझे गाव आणि माझा विकास या विचाराने मतदान करेल, त्या दिवशी खरी लोकशाही अधिक सक्षम आणि अर्थपूर्ण बनेल.


### जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, धर्माबाद यांचे न्यायालय
दिवाणी किरकोळ अर्ज (आर.जे.ई.) क्र. ७६/२०२६
वंदनाबाई विरुध्द भोजाबाई व इतर

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ व ३ अन्वये हिअरशीप प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : वंदनाबाई भ्र.चंद्रकाथ उर्फ चंद्रकांत जगताप, वय ४६ वर्ष, धंदा घरकाम, रा. ४-३-१/१A-/१७ राजीवनगर, भैंसा, जि. अदिलाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार:१) भोजाबाई भ्र. बाबूराव जगताप, वय ६६ वर्ष, धंदा घरकाम, रा. राजीवनगर, भैंसा, जि.अदिलाबाद ह.मु. येताळा, ता. धर्माबाद, जि.नांदेड.

२) बाबूराव पिता भोजराम जगताप, वय ७५ वर्ष, धंदा शेती, रा. राजीवनगर, भैंसा, जि. अदिलाबाद ह.मु. येताळा, ता. धर्माबाद, जि.नांदेड.

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ नुसार अर्जदार यांना कायदेशीर वारसा प्रमाणपत्र Legal Heirship Certificate प्रदान करणे.

सदरील जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्या प्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार हे मयताचे वारस असुन त्यांच्या व्यतिरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत चंद्रकांत पिता बाबु उर्फ बाबुराव जगताप यांचे निधन दिनांक २६.०४.२०२४ रोजी झाले आहे आणि त्यांच्या मरणोपरांत मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ व ३ अन्वये हिअरशीप प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील ॲड. जी. एस. भालेराव यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरील प्रमाणपत्र हे शासकीय व खाजगी कामासाठी आवश्यक असल्याबाबत नमुद केले आहे.

हे की प्रस्तुत प्रकरणात वरील बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणणे सदरील जाहिर प्रगटन प्रकाशित झाल्यापासुन विहित मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहित धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानीशी दिला.

(न्यायालयाची मोहर)
आदेशावरुन

स्वाक्षरित/- कनिष्ठ लिपीक
स्वाक्षरित/- सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,धर्माबाद,जि.नांदेड.


# जनकल्याण पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

किनवट/प्रतिनिधी-सभासदांच्या सहकार्यामुळेच जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था (मर्यादित किनवट) उत्तरोत्तर आर्थिकोन्नतीची आगेकूच करीत आहे. वृक्षारोपण या राष्ट्रीय कार्यापासून ते तळागाळातील लोककल्याणासाठी केलेल्या कार्याचाही आढावा २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थितांच्या समोर मांडून, सभासदांनी भविष्यातही असेच अविरत सहकार्य करण्याचे प्रा.प्रकाश उत्तरवारांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी आवाहन केले.

स्थानिक विद्या शिशु वाटिका डॉ.हेडगेवारनगर योगाभवनात २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नांदेड विभाग कार्यवाह डॉ.हेमंत सोपानराव इंगळे, विभाग संघचालक संतोष नरसिंगराव तिरमनवारांसह अन्य




मान्यवरांची उपस्थिती होती. नांदेड विभाग कार्यवाह हेमंत इंगळे यांनी जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना ते आजपर्यंत झालेल्या कामाचा व सेवाकार्याचा आढावा मांडला. किनवट तालुक्यातील १५० शाळांना भारतमातेच्या प्रतिमा वितरण केल्या. दोन दिवशीय डॉ.हेडगेवार व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले. शहरातील विविध भागात वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा केला. पोलीस स्टेशन किनवट येथे चार बॅरिकेटचे वाटप आणि भाजीपाला, फळ विक्रे त्यांना उन्हाच्या संरक्षणासाठी छत्र्यांचे वाटप. हिंदू गोरबंजारा नायक कारभारी परिषद, जनजाती कल्याण आश्रमास आर्थिक सहाय्य, कोलामखेडा, पिंपळगाव येथील १७ विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांचे शैक्षणिक पालकत्व, प्रवास खर्चासह शालेय साहित्याचे पतसंस्थेच्या सभेत वाटप करण्यात आले. यावर्षी संस्थेला 'अ' ग्रेड नामांकन मिळाला असून, आर्थिक प्रगतीतही मोठी वाढ झाल्याचा प्रगती अहवाल डॉ.हेंमतजी ईगंळे यांनी मांडला. पतसंस्थेच्या उन्नतीसाठी सभासदांनी यापुढेही असेच सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्तविलीय. सुत्रसंचालन ऊल्हास जाधव यांनी केले. प्रास्ताविक रोहित चाडावार आणि संतोष पेटकुले यांनी आभार मानले. पतसंस्थेच्या वार्षिकसभेसाठी संचालक रोहित चाडावार, राजू कट्टावार, संतोष पेटकुले, उल्हासजी जाधव, डॉ.वंदनाताई पत्की, डॉ.अनुराधा उपासनी, व्यवस्थापक प्रवीण सातुरवार व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केल्याचे सूत्रांनी सांगितले.

# पिंपळगाव फाटा येथे जीवनावश्यक भांड्यांचे वाटप

मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील पिंपळगाव फाटा परिसरात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांना मदतीचा हात देत किनवट अर्बन निधी लिमिटेड आणि श्री गोविंद मगरे पाटील बहुजन मायक्रो फायनान्स यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनावश्यक भांड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे संकटग्रस्त कुटुंबांना दैनंदिन जीवन पुन्हा सुरळीत करण्यासाठी मोठा आधार मिळाला.

या मदतवाटप कार्यक्रमाला पिंपळगावचे उपसरपंच दत्ता गुरनुले, किनवट अर्बन निधी लिमिटेडचे अध्यक्ष विजय मगरे, व्यवस्थापक ऋषिकेश चौधरी, फिल्ड ऑफिसर हर्षल शेंडे तसेच युवराज आडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कुटुंबांना भांड्यांचे वितरण करण्यात आले.यावेळी मान्यवरांनी नैसर्गिक आपत्तीच्या काळात समाजातील सक्षम घटकांनी गरजूंच्या पाठीशी उभे राहणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. संकटग्रस्त नागरिकांना वेळेवर मदत मिळाल्यास त्यांना नव्याने उभारी मिळते, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.या उपक्रमाबद्दल लाभार्थी कुटुंबांनी किनवट अर्बन निधी लिमिटेड व श्री गोविंद मगरे पाटील बहुजन मायक्रो फायनान्सचे आभार मानले. संकटसमयी मिळालेल्या या मदतीमुळे बाधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली.


सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# इदगाह कमान रोड ते बोंढार बायपास रस्त्यावरील अतिक्रमणे महापालिकेने हटविले






नांदेड/प्रतिनिधी-मंजुर विकास आराखड्यातील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या इदगाह कमान ते बोंढार बायपासकडे जाणारा रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यासाठी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने दि.३ ऑगस्ट रोजी एक मोठी आणि धडक मोहीम हाती घेण्यात आली. मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे आणि पोलीस अधिक्षक डॉ.निलभ रोहन यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली, शहरातील मुख्य मार्ग असलेल्या इदगाह कमान रोड ते बोंढार बायपास रोडवरील अनेक वर्षांचे पक्के व कच्चे अतिक्रमण मनपाच्या पथकाने सोमवारी जे.सी.बी.च्या साहाय्याने पूर्णपणे जमीनदोस्त केले आहे.

इदगाह कमान ते बोंढार बायपास हा मंजुर विकास आराखड्यानुसार ६० फुटाचा रस्ता करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत करण्यात येत होते. परंतु येथील अतिक्रमणामुळे मागील दोन वर्षापासुन सदरील रस्त्याचे काम प्रलंबित होते. रस्ता रुंदीकरणाच्या जागेत स्थानिक नागरिकांनी आपली घरे ३३ फुटा पर्यंत रस्त्यावर अतिक्रमण करत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर ताबा मिळवला होता. यामुळे या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामात अडथळा निर्माण होत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने महापालिकेस केलेल्या पत्रव्यवहारानुसार मनपाच्या अतिक्रमण हटाव पथकाने या संपूर्ण मार्गावरील १० ते १५ घरांची पक्की बांधकामे, अनधिकृत शेड्स, आणि दुकानांचे वाढीव भाग हटवून अतिक्रमित भाग पूर्णपणे मोकळा केला आहे.केवळ बायपास रस्ताच नव्हे, तर नांदेड वाघाळा मनपा हद्दीतील इतरही प्रमुख भागांत ही धडक मोहीम राबवण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने वजिराबाद भागातील तिरंगा चौकातील रस्ते आणि पदपथांवर अनधिकृतपणे थाटलेली दुकाने व व्यावसायिक अडथळे हटवण्यात आले. तसेच जुन्या नांदेड भागातील मॅफको रोड येथे सुध्दा कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काही ठिकाणी अतिक्रमणधारकांनी प्रशासकीय कामात अडथळा आणण्याचा किंवा हुज्जत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. सदरील कारवाई अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, अतिक्रमण पथक प्रमुख दत्ता कल्याणकर, विशाल सोनकांबळे यांच्यासह अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली.

## शहरातील विविध भागांतही धडक कारवाई

### मनपा प्रशासनाचा कडक इशारा

शहरातील सर्व व्यावसायिक आणि नागरिकांनी सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि महापालिकेच्या जागेवर पुन्हा अतिक्रमण करू नये. अतिक्रमण काढण्याच्या कारवाईत जप्त केलेले साहित्य परत केले जाणार नाही आणि दंडही ठोठावला जाईल. त्यामुळे शहराच्या विद्रुपीकरणाला कारणीभूत ठरणारे आणि वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे, अन्यथा मनपातर्फे अशाच प्रकारे तीव्र स्वरूपाची बुलडोझर कारवाई करण्यात येईल,असा इशारा मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी दिला आहे.

# मुंबई-नांदेड विमानसेवा नियमित करा!:खा.अशोकराव चव्हाण

## नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची घेतली भेट

नांदेड/प्रतिनिधी-मुंबई-नांदेड-मुंबई मार्गावरील विस्कळीत विमानसेवेमुळे प्रवाशांचे हाल होत असून, ही सेवा नियमित करण्याची मागणी राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केली आहे. त्यांनी संसदेत केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन त्यांना यासंदर्भात सविस्तर पत्र दिले.



खा. अशोकराव चव्हाण यांनी केंद्रीय राज्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सध्या या महत्त्वाच्या मार्गावर आठवड्यातून केवळ दोनच दिवस विमानसेवा उपलब्ध आहे. त्यातही गेल्या तीन आठवड्यांपासून अनेकदा विमाने रद्द होण्याचे प्रकार घडले आहेत. या अनियमिततेमुळे नांदेडला ये-जा करणाऱ्या प्रवाशांचे मोठे हाल होत असून, त्यांना नाहक आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. नांदेड शहराचे ऐतिहासिक, व्यावसायिक आणि धार्मिक महत्त्व लक्षात घेता, देश-विदेशातून येथे येणाऱ्या भाविकांची आणि प्रवाशांची संख्या मोठी आहे. त्यामुळे मुंबई-नांदेड मार्गावर प्रवाशांची कायम मोठी संख्या असते. मात्र, सध्याची कमी क्षमतेची आणि कमी फेऱ्यांची विमानसेवा वाढत्या प्रवासी संख्येसाठी अपुरी पडत आहे. त्यामुळे या मार्गावर 'एअर इंडिया' किंवा 'इंडिगो' यांसारख्या प्रमुख विमान कंपन्यांमार्फत 'बोईंग' किंवा 'एअरबस'सारखी अधिक प्रवासी क्षमता असलेली मोठी विमाने दररोज चालवण्यात यावीत, अशी मागणी खा. अशोकराव चव्हाण यांनी केली आहे. तसेच या मार्गावरील विमानसेवा प्रादेशिक संपर्क योजनेत समाविष्ट करावी, जेणेकरून सर्वसामान्यांना हा विमान प्रवास परवडणारा ठरेल, असेही त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# महिन्यापूर्वी १८० रुपये किलो;आता डाळींबाचा भाव शंभर रुपये


देगलूर/प्रतिनिधी-'डाळिंबाचे आगार' समजल्या जाणाऱ्या बाजारपेठामध्ये सध्या डाळिंबाच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळत आहे., महिनाभरापूर्वी किलो मागे १८० रुपयावर असलेला डाळिंबाचा भाव बाजारात ग्राहकांची मागणी नसल्याने चांगलाच गडगडला असून तो १०० रुपयावर आला आहे. या अचानक झालेल्या दर कपातीमुळे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसला आहे. शेतकऱ्यांचा वाहतूक आणि काढणीचा खर्चही निघणे मुश्किल झाले आहे.

## वाहतूक काढणीचा खर्चही निघेना

गेल्या काही दिवसात मराठवाड्यातील प्रमुख बाजारपेठामध्ये डाळिंबाची आवक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा अधिक होत असल्याने डाळिंबाच्या दरामध्येही घसरण झाली आहे. बाजारात मालाची टंचाई असल्याने चांगल्या दर्जाच्या डाळिंबाला १८० रुपयापर्यंत उच्चांकी भाव मिळत होता. परंतु आता हाच दर शंभर रुपयांनी घसरला आहे. खते, औषधे आणि मशागतीसाठी केलेला खर्च पाहता सध्याचा दर शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान देणारा ठरत आहे. दुसरीकडे आहे ना माझ्या तोंडावर बाजार भाव निम्म्याहून अधिक घसरल्याने 'कष्टांचे फळ' मातीमोल भावाने विकण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. देगलूर तालुक्यात बऱ्यापैकी शेतकरी आपल्या शेतामध्ये डाळिंबाचे फळ या पिकाची घेतले आहे मात्र पाऊस कमी पडल्याने डाळिंबाला आतून रंग येत नसल्याने हा मार्ग व्यापारी योग्य भावाने घेत नाहीत. जुन्या ,नवा माल एकत्र आल्याने मोठ्या प्रमाणावर आवक वाढल्याने भाव वधारले आहेत. दररोज चार-पाच गाड्या मार निर्यात करायचो आता माल शिल्लक असल्याने उठाव नाही ट्रक ऐवजी आता डाळिंबाचा मात पाठवावा लागत आहे दिवसभरातून एकच पिकप भरली जाते अशी देगलूर येथील व्यापारी सांगितले आहे. किलोपर्यंत भाव होता. मात्र सध्या हा भाव कमी झाला असून, १०० रुपये किलो पर्यंत बाजार भाव मिळत आहे. अचानक दर कपात झाल्याने खर्च झालेला पैसा तरी निघतो की नाही ही चिंता शेतकऱ्यांमध्ये दिसून येत आहे.

# धर्माबाद शहरात घाणीचे साम्राज्य;प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरातील छत्रपती शिवाजी महाराजनगर वार्ड क्रं ६ व प्रमुख रस्ते आणि शासकीय कार्यालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचल्याने शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी कचरा पडून असल्यामुळे नागरिकांना दुर्गंधी व अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. नगरपालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेतील हलगर्जीपणा, संबंधित ठेकेदाराचे दुर्लक्ष आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची उदासीनता यामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याची नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. यापूर्वी नगरपरिषद मुख्याधिकारी या समस्येबाबत सूचना देण्यात आल्या होत्या मात्र, त्यानंतरही परिस्थितीत कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरात घंटा गाडी येत नसल्याने कचऱ्याचा ढीग साचत असल्याने धर्माबाद शहराच्या स्वच्छ प्रतिमेला तडा जात असून नागरिकांच्या आरोग्यावरील विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात राष्ट्रीय मानवाधिकारी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ तौफिक खान शहावली खान पठान यांनी नगरपरिषद प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून शहरातील कचरा हटवावा संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करावी आणि धर्माबाद शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणीचे निवेदन दिले आहे. जर स्वच्छता लवकर झाली नाही तर पुढे जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



# 'उपन्यास सम्राट' प्रेमचंद यांना सायन्स कॉलेजमध्ये अभिवादन; साहित्य वारशाचा विद्यार्थ्यांना परिचय

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील सायन्स महाविद्यालयात हिंदी-उर्दू साहित्यातील ज्येष्ठ साहित्यिक तथा 'उपन्यास सम्राट' मुंशी प्रेमचंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रेमचंद यांच्या साहित्यसेवेचा व सामाजिक विचारांचा परिचय करून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ड. प्रदीप नागापूरकर व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एल. पी. शिंदे यांच्या हस्ते मुंशी प्रेमचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना प्रेमचंद यांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकण्यात आला. अत्यंत




प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून त्यांनी शिक्षक म्हणून कारकीर्द सुरू केली. मात्र महात्मा गांधी यांच्या असहकार आंदोलनाने प्रेरित होऊन १९२१ मध्ये त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. साहित्याच्या माध्यमातून समाजातील हुंडाबळी, जातीयता, स्त्री शिक्षण, शेतकऱ्यांचे शोषण अशा विविध सामाजिक प्रश्नांना त्यांनी प्रभावीपणे वाचा फोडली. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये मानवी वेदना, संघर्ष आणि आशावादाचे वास्तववादी चित्रण असल्याने त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन उपप्राचार्या तथा हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. सौ. अरुणा राजेंद्र शुक्ला यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मुंशी प्रेमचंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.


## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नांदेड यांच्या नायायाल्यात

Civil M.A.No.1055/2026

CNR No.: MHND020021062026

अर्जदार:- १) विलास सखाराम गायकवाड वय : ४३ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, मोबा. क्र.९८५०३२८७६३, २) गणेश सखाराम गायकवाड वय : ४१ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, ३) बालाजी सखाराम गायकवाड वय : ३९ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, ४) रमेश सखाराम गायकवाड वय : ३५ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, अर्जदार क्र. १ ते ४ सर्व रा.घर क्र.१-९-७१६, नंदीग्राम हाऊसिंग सोसायटी, शारदा नगर मागे, तरोडा (बु.), ता. व जि. नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार: कैलास सखाराम गायकवाड वय : ४५ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, नांदेड.

दावा: बॉम्बे रेगुलेशन कायदा क्र.VIII च्या १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाण पत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मयत सखाराम देवराव गायकवाड यांचे दि. २१-०४-२०२६ रोजी निधन झाल्यामुळे, स्वतःच्या तसेच प्रत्यर्थी कैलास सखाराम गायकवाड यांच्या नावे मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळख निश्चित होऊन शासकीय तसेच इतर अधिकृत कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळावे, यासाठी मा. न्यायालयात सदर अर्ज दाखल केला आहे.

मयत सखाराम देवराव गायकवाड हे घर क्र. १-९-७१६, नंदीग्राम हाऊसिंग सोसायटी, शारदा नगर मागे, तरोडा (बु.), ता. व जि. नांदेड येथील कायमस्वरूपी रहिवासी होते. त्यांचे दि. २१-०४-२०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी निधन झाले आहे.

अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ तसेच कैलास सखाराम गायकवाड हे मयताचे पुत्र व कायदेशीर वारस आहेत. सदर अर्ज हा केवळ मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळख निश्चित होण्यासाठी व शासकीय तसेच इतर अधिकृत कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आलेला आहे.

तरी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ ते ४ व कैलास सखाराम गायकवाड यांना मयत सखाराम देवराव गायकवाड यांचे कायदेशीर वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत या जाहीर प्रगटनाच्या प्रसिद्धीपासून तीस (३०) दिवसांच्या आत अथवा दिनांक २७-०८-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहून आपली हरकत दाखल करावी. अन्यथा, कोणतीही हरकत नसल्याचे गृहीत धरून अर्जदार व प्रत्यर्थी यांच्या बाजूने योग्य तो आदेश पारित करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३-०८-२०२६ रोजी माझ्या साहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/-
क.लिपिक | सहाय्यक अधीक्षक
६ वे सह दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर, नांदेड

## जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायाधीश,कनिष्ठ स्तर,अर्धापूर यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई.) क्रमांक १५६/२०२६

या प्रकरणातील

अर्जदार क्रं. : १) सारजाबाई भ्र.रामजी लोणे वय : ८० वर्षे, धंदा : घरकाम, २) अनिरुध्द पि.रामजी लोणे वय : ५१ वर्षे. धंदा शेती, ३) देवराव पि.रामजी लोणे वय : ४५ वर्षे, धंदा : शेती, तिघे रा. लोणी (खु) ता. अर्धापूर जि.नांदेड, ४) विश्राताबाई भ्र. संभाजी बिरहाडे, विश्राताबाई पि. रामजी लोणे) वय : ६२ वर्ष, धंदा : घरकाम, रा. पाटनुर ता. अर्धापूर जि. नांदेड, ५) क्रांतीबाई भ्र.मारोती वाहेवळ (क्रांतीबाई पि.रामजी लोणे) वय : ६० वर्षे, धंदा : घरकाम, रा.लहान ता.अर्धापूर जि.नांदेड, ६) छायाबाई भ्र. रमेश रोकडे (छायाबाई पि.रामजी लोणे) वय : ५४ वर्षे, धंदा : घरकाम, रा. ढोकी ता.जि.नांदेड, ७) रेखा भ्र.नागोराव कोकरे (छायाबाई पि. रामजी लोणे) वय : ५३ वर्षे, धंदा : घरकाम, रा.तरोडा बु ता.जि.नांदेड, ८) बायनाबाई भ्र. दिलीप पोहरे (बायनाबाई पि. रामजी लोणे), वय : ५१ वर्षे, धंदा : घरकाम, रा.लिंबगाव ता.जि. नांदेड, ९) तारामती भ्र.वामनराव सदावर्ते (तारामती पि. रामजी लोणे) वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम, रा. रांजणगाव ता.जि.औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), १०) केसर भ्र. तुकाराम वागरे (केसर पि. रामजी लोणे) वय : ४६ वर्षे, धंदा : घरकाम, रा.लिंबगाव ता.जि. नांदेड

विरूध्द

गैर अर्जदार : निरंक

विषय :- बॉम्बे रेगलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत रामजी ग्यानोबा लोणे यांचे अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ हे मुले आहेत व अर्जदार क्र.४ ते १० ह्या मुली आहेत. मयत रामजी ग्यानोबा लोणे यांचा मृत्यू दिनांक : ०५/११/२०२० रोजी झाला. रा.लोणी खु.ता. अर्धापूर जि.नांदेड

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.०८/०९/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक : ३/०८/२०२६ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/- | आदेशावरुन स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर,अर्धापूर | दिवाणी न्यायालय क.स्तर,अर्धापूर

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नांदेड यांच्या नायायाल्यात

Civil M.A.No.1069/2026

CNR No.: MHND020021392026

अर्जदार:- अब्दुलवाहब पि. अब्दुलईमाम शेख वय : ७० वर्षे, व्यवसाय : व्यवसाय रा.भवसारा चौक, सरपंच नगर, सिंचन कॉलनी, नांदेड. मोबा. ९१७५५७१११६.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन कायदा क्र.VIII च्या १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाण पत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार हे मयताचा मुलगा आहे. मयत अमीरबी भ्र. शेख इमाम, रा. सिंचन कॉलनी, नांदेड. तरोडा खु. नांदेड येथील रहिवासी होते. त्यांचे दिनांक ०३-०७-२०२६ रोजी नांदेड येथे निधन झाले आहे.

मयत नामे अमीरबी भ्र.शेख इमाम, यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत, असे अर्जदारांनी नमूद केले आहे. अर्जदार यांनी वारसहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील अर्जदारांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्य वकिलामार्फत तीस दिवसांच्या आत किंवा दिनांक ३०-०८-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे. अन्यथा अर्जदारांच्या बाजूने योग्य तो आदेश पारित केला जाईल, याची सर्व जबाबदारी संबंधितांवर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३-०७-२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/-
क.लिपिक | सहाय्यक अधीक्षक
६ वे सह दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर, नांदेड

जा.क्र./क्षेकाक्रं.५ ईतवारा/नापवि/५३३/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०३-०८-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.७४/४०/क्षे.का.क्र.०५/२०२६-२७**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. **सुरेश देविदासराव धर्माधिकारी** रा.**सिध्दनाथपुरी,** नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, सि.स.नं. **१४००४, पैकी** शेत सर्व्हे नं.**शिट नं.२६०** प्लॉट नं.**-- जागा/घर, (एकुण क्षेत्रफळ ६२.४६ चौ.मी.)** महानगरपालिका मालमत्ता नं.**८-४-६० (पिन नं. ४०३०८००३०८) विक्रीखत दस्त क्र.८९६६ दि.११-१०-२०२५ श्री/भो./देविदासराव बालभट्ट धर्माधिकारी,** च्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने वारसा मृत्युः प्रमाणपत्र/आधारे पी.आर.कार्ड/७/१२ दि.०६.०७.२०२६ आधारे विकत घेतली आधारे मालकी हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नावे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी, या संबंधात कोणास कांही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील मालमत्ता नोंद घेण्यास येईल.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# 'गांधीजींच्या मारेकऱ्यांनी संविधान शिकवू नये';दिपकेंचा संघावर पलटवार

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी-ज्यांनी महात्मा गांधींची हत्या केली, ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आयुष्यभर विरोध केला, त्यांनी आम्हाला संविधानावर ज्ञान पाजळू नये, अशा शब्दांत दिपके यांनी संघावर निशाणा साधला.

दिल्लीतील जंतर-मंतर येथील कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी)च्या आंदोलनावरून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर-सहकार्यवाह अतुल लिमये यांनी केलेल्या टीकेला सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी जोरदार प्रत्युत्तर देत संघावर थेट हल्लाबोल केला. मंगळवारी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत बोलताना दिपके यांनी जंतर-मंतर आंदोलनाला देशविरोधी आणि लोकशाहीविरोधी ठरवणाऱ्या अतुल लिमये यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. लोकशाहीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी आम्हाला देशभक्तीचे प्रमाणपत्र देण्याची गरज नाही, असा पलटवार त्यांनी केला.सरसंघचालक मोहन भागवत ६ ऑगस्ट रोजी मुंबईत 'जनरेशन झी' आणि 'जनरेशन अल्फा'मधील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असल्याच्या कार्यक्रमावरही दिपके यांनी टीका केली. संघाला आता तरुणांशी बोलण्याची गरज वाटत आहे, ही चांगली बाब आहे. पण वृद्ध नेतृत्वाने तरुणांना उपदेश करण्यापेक्षा तरुण चेहरे पुढे आणावेत. शिकलेले, नव्या विचारांचे नेतृत्व उभे केले तरच त्याला अर्थ आहे, असे ते म्हणाले.सीजेपीची दोन दिवसांची बैठक छत्रपती संभाजीनगर येथे होत असून, जंतर-मंतर आंदोलनाचा आढावा, संघटना विस्तार आणि पुढील राजकीय रणनीतीवर चर्चा होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.दरम्यान, अतुल लिमये यांनी यापूर्वी जंतर-मंतर आंदोलनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. हे आंदोलन सुरुवातीला विद्यार्थ्यांचे असले तरी नंतर त्यावर डाव्या संघटनांनी ताबा मिळवला, असा दावा त्यांनी केला होता.

# मांडवीतील मटन मार्केट तात्काळ स्थलांतरित करा

## महिलांनी दिला ग्रा.पं.समोर उपोषणाचा इशारा



मांडवी/प्रतिनिधी-गावाच्या मध्यवर्ती भागात सुरू असलेले मटन, चिकन व मच्छी मार्केट तातडीने अन्यत्र स्थलांतरित करावे, अन्यथा येत्या १५ ऑगस्ट (स्वातंत्र्यदिन) रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर दहा महिला एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करतील, असा लेखी इशारा मांडवी येथील महिला मंडळाने ग्रामपंचायतीला दिला आहे.

महिला मंडळाच्या निवेदनानुसार, सध्या सुरू असलेल्या मटन मार्केटमुळे परिसरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा मोठा वावर वाढला असून, ते मांस, हाडे व कातडी उचलून जवळील सेवालाल मंदिर व जगदंबा माता मंदिर परिसरात नेत असल्याने मंदिरांच्या पावित्र्यावर परिणाम होत आहे. तसेच गाव वसल्यापासून ज्या ठिकाणी पवित्र होळी प्रज्वलित केली जाते, त्याच परिसरात मटन मार्केट सुरू असल्याने धार्मिक परंपरेलाही धक्का बसत असल्याची भावना महिलांनी व्यक्त केली आहे.मार्केटलगत सरस विद्यालयाची नर्सरी शाळा असून, लहान मुले शाळेत ये-जा करताना मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच शेजारीच असलेल्या कमला नेहरू मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहातील तसेच विनाताई मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींना दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत असून, त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय ग्रामपंचायतीच्या मालकीची व्यायामशाळा व जिमखाना दुर्गंधीमुळे वापरात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. रस्त्यावरच मच्छी व मटन विक्री होत असल्याने सेवालाल मंदिरात दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना रक्त, मांस व हाडांमधून मार्ग काढावा लागत असून, त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याचेही महिलांनी म्हटले आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने मटन, चिकन व मच्छी विक्रेत्यांसाठी गावाबाहेर योग्य ठिकाणी शेड, ओटे, पाणी व वीज यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत मार्केटचे तातडीने स्थलांतर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा १५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. तसेच भविष्यात शाळकरी मुलांवर कुत्र्यांचा हल्ला झाल्यास, वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्यास किंवा सेवालाल मंदिर परिसराची विटंबना झाल्यास त्यास ग्रामपंचायत प्रशासन जबाबदार राहील, असेही महिलांनी स्पष्ट केले आहे.या मागणीला सेवालाल मंदिर समिती व संत सेवालाल जयंती समिती यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. यावेळी सरपंच सुमनबाई पेंदोर, उपसरपंच सरोज चव्हाण, पॅनल प्रमुख प्रफुल्ल राठोड, ग्रामपंचायत अधिकारी सुरेश पडलवार, गावचे नाईक बाबुसिंग राठोड, कारभारी प्रदीप चव्हाण, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कुंदन पवार यांच्यासह ग्रामस्थ व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# थायलंडहून दिल्लीत येणाऱ्या विमानाला हवेत जोरदार धक्के

## वैमानिकाचे प्रसंगावधान;काही प्रवाशी जखमी

नवी दिल्ली:थायलंडमधील फुकेटहून दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या एआय-२३७९ या विमानाला मंगळवारी (४ ऑगस्ट) उड्डाणादरम्यान अचानक तीव्र टर्ब्युलन्सचा सामना करावा लागला. हवेत बसलेल्या जोरदार धक्क्यांमुळे विमान काही क्षणांसाठी खाली आल्याने प्रवाशांमध्ये एकच घबराट उडाली. मात्र, वैमानिकांनी प्रसंगावधान राखत विमान सुरक्षितपणे दिल्ली विमानतळावर उतरवले. त्यामुळे मोठा अनर्थ ठळला. काही प्रवाशी व विमानातील कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांच्यावर विमानतळावरच उपचार करण्यात आले.

एअर इंडियाच्या माहितीनुसार, विमानातील १३४ प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित असून काही प्रवासी व विमान कर्मचाऱ्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. त्यांना तातडीने विमानतळावरील वैद्यकीय केंद्रात तपासणीसाठी पाठविण्यात आले असून सर्वांची प्रकृती स्थिर आहे. कोणालाही गंभीर दुखापत झालेली नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले. घटनेनंतर एका प्रवाशाने सांगितले की, उड्डाणाला सुमारे दीड तास झाला असताना बहुतांश प्रवासी झोपले होते. त्याचवेळी विमानाला अचानक जोरदार धक्के बसू लागले. काही मिनिटे विमान वर-खाली हेलकावे खात असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले. या धक्क्यांमध्ये काही प्रवासी जखमी झाल्याचा दावा त्याने केला. एअरलाइनच्या सूत्रांनुसार, दिल्लीत उतरण्यापूर्वी विमान 'क्लिअर एअर टर्ब्युलन्स'च्या विळख्यात सापडले. स्वच्छ आकाशात कोणतेही ढग किंवा वादळ नसतानाही वातावरणातील हवेच्या प्रवाहात अचानक बदल झाल्याने अशा प्रकारचे धक्के बसतात. त्यामुळे वैमानिकांनाही त्याचा पूर्वीच अंदाज येणे कठीण असते.या घटनेत विमानाचेही किरकोळ नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, सर्व सुरक्षा प्रक्रिया पाळून विमान सुरक्षितपणे दिल्ली विमानतळावर उतरवण्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली

# तब्बल तीन कोटी सेहचाळीस लाखाची योजना ठरली फेल

## लोणी गावातील जल जीवन योजनेची कामे तीन वर्षांपासून अर्धवटच

देगलूर/प्रतिनिधी-केंद्र सरकारच्या हर घर जल या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत देगलूर तालुक्यातील लोणी ग्रामपंचायत येथे तब्बल तीन कोटी सेहचाळीस लाख रुपयांची जलजीवन मिशन योजना मंजूर करण्यात आली. प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ व मुबलक पाणी पोहोचावे, महिलांची पाण्यासाठी होणारी भटकंती थांबावी आणि ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर व्हावी हा या योजनेमधील उद्देश होता.मात्र गेल्या तीन वर्षांपासून ही योजना अर्धवटच अवस्थेत पडून असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

लोणी पासून जवळच असलेल्या भुत्तहनीपरगा तलावापासून सहा किलोमीटर पाईपलाइन अर्धवट झाली असून, गावामध्ये जलवाहिनी टाकण्यांचे काम, पाण्याची टाकी, विहीर, तसेच इतर तांत्रिक कामे अद्याप पूर्ण झाली नसल्याचे तर अनेक ठिकाणी पाईपलाईनचे काम अर्धवट सोडण्यात आले असून काही ठिकाणी खोदलेले रस्ते तसेच पडून असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे उन्हाळ्याच्या तीव्र झळा बसत असताना देखील गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ग्रामस्थांच्या मते, संबंधित अधिकारी आणि गुत्तेदार यांच्या हालगर्जीपणामुळे योजना रखडली असून कामाची गती अत्यंत मंद आहे. अनेक वेळा तक्रारी करून ही प्रशासनाकडून ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप गावातील सामाजिक कार्यकर्ते शिवाजी शिंदे यांनी सांगितले आहे. तीन कोटी पेक्षा अधिक निधी खर्च होऊनही गावाला पाणी मिळत नसेल तर ही योजना नेमकी कोणासाठी? असा संताप सवाल निवेदनाद्वारे शिवाजी शिंदे यांनी केला आहे. लोणी गावातील महिलांना आजही दूरवरून पाणी आणावे लागत असल्याने शासनाच्या जलजीवन मिशन योजनेच्या कामावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाली आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी या योजनेकडे गांभीर्याने लक्ष देऊन रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावी व ग्रामस्थांना नियमित पाणीपुरवठा सुरू करावा अशी मागणी होत आहे.

# तीन हजारांची लाच स्वीकारणारा डॉक्टर एसीबीच्या जाळ्यात

धर्माबाद/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील करखेली प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सोमेश नागोराव मोरे (वय ३५) यांना तीन हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडल्याने तालुक्यातील आरोग्य विभागात एकच खळबळ उडाली आहे.

डॉ. सोमेश मोरे हे करखेली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी (वर्ग-अ) म्हणून कार्यरत असून त्यांचे वास्तव्य धर्माबाद येथील शिव मंदिराजवळील शिक्षक कॉलनीत आहे. सोमवारी (दि. ३ ऑगस्ट) दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार, तक्रारदार हे करखेली प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या वार्षिक कार्य मूल्यमापन (एपीएआर) अहवालावर अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करून तो पुनर्विलोकनासाठी जिल्हा हिवताप अधिकारी, नांदेड यांच्याकडे पाठविण्यासाठी डॉ. मोरे यांनी चार हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. त्यामध्ये तडजोडीनंतर तीन हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानुसार तक्रारदार यांनी करखेली प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. मोरे यांना तीन हजार रुपयांची लाच दिली. लाचेची रक्कम स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी डॉ. सोमेश मोरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

# कंधार येथे'१० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा अभियानाचा'शुभारंभ

कंधार/प्रतिनिधी-ब्रह्माकुमारीज, उपसेवा केंद्र कंधारच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील जुमडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.४ ऑगस्ट रोजी १० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. समाजात वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेविरुद्ध जनजागृती करून नशामुक्त समाज घडविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

ब्रह्माकुमारीज उपसेवा केंद्र कंधारच्या संचालिका ज्योती बहेनजी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,आज लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत व्यसनाधीनतेचे वाढते प्रमाण ही गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी कुटुंब, शाळा, सामाजिक संस्था, प्रशासन आणि सर्व समाजघटकांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज आहे. आध्यात्मिक मूल्ये आणि सकारात्मक जीवनशैली स्वीकारल्यास व्यसनमुक्त भारताचे ध्येय निश्चितच साध्य होऊ शकते, सांगून कंधार शहरातील व तालुक्यातील शाळा




कॉलेजातून तरुणासह शिक्षक, पालक यांनी नशामुक्तीची शपथ दि.२ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधी दरम्यान मोठ्या प्रमाणात घेण्याचे आवाहन ज्योती बहेनजी यांनी केले. कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील जुमडे यांनी मार्गदर्शन केले.

# छगन पाटील यांचे दुःखद निधन


नांदेड/प्रतिनिधी-बँक ऑफ बडोदा मधील सेवानिवृत्त अधिकारी छगन बळीराम पाटील (वय ७२) रा.उमरी जहांगीर ता.हदगाव ह.मु.डोंबिवली



(मुंबई) यांचे अल्पशा आजाराने सोमवार दि.३ ऑगस्ट रोजी मध्यरात्री खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, एक मुलगी, सुना, जावई, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार दि.४ ऑगस्ट रोजी डोंबिवली पूर्व येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# वि.हिं.प.चे जेष्ठ नेते नरसिंगराव सातुरवार यांचे निधन

किनवट/प्रतिनिधी-किनवट येथील श्रीराम मंदीर संस्थानचे संस्थापक अध्यक्ष, विश्व हिंदू परिषदेचे जेष्ठ नेते तथा सरस्वती शिक्षण संस्थेचे संस्थापक विश्वस्थ नरसिंगराव सातुरवार यांचे आज मंगळवार दि.४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता वयाच्या ८८ व्या वर्षी अल्पशा आजाराने साने गुरुजी रुग्णालयात उपचार सुरु असतांना दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी, सुना, नातवंडं असा परिवार आहे. पैनगंगा तीरावरील कैलास मोक्षधाम घाट येथे त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार संस्कार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



स्व.नरसिंगराव सातुरवार यांची किनवटच्या एकेकाळच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका होती. विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून सर्वदूर त्यांचा परिचय होता. सरस्वती शिक्षण संस्था नावारूपाला आणण्यात स्व.सातुरवारांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यामुळे विविध क्षेत्रातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# अतिवृष्टीने पिंपळगाव परिसरात मोठे नुकसान;तात्काळ मदतीसह पूल दुरुस्ती करा

## सरपंच पुरुषोत्तम पेंदोर यांची मागणी

मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील पिंपळगाव (सी) परिसरात ३० जुलै रोजी झालेल्या धुवांधार अतिवृष्टीमुळे नद्या-नाल्यांना भीषण पूर आला. या आपत्तीत परिसरातील नागरिकांच्या घरांची पडझड झाली असून, शेतात पुराचे पाणी शिरल्याने हजारो हेक्टरवरील पिके खरडून गेली आहेत. अनेक ठिकाणच्या जमिनी वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे.

या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका पिंपळगाव, तलाईगुडा, कोलामगुडा, लिमगुडा, मिनकी आणि शामपूर या गावांना बसला आहे. येथील शेतकऱ्यांची उभं पिके आणि सुपीक जमीन खरडून गेल्यामुळे बळीराजा पूर्णपणे हवालदिल झाला आहे. तसेच, गावाला जोडणाऱ्या नाल्यांवरील पूल तुटल्यामुळे वाहतूक आणि संपर्क व्यवस्था ठप्प झाली आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने कोणतीही आट व शर्ती न लावता ५० हजार रुपये सरसकट मदत द्यावी, तसेच तुटलेल्या पुलांची तात्काळ दर्जेदार दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी पिंपळगावचे सरपंच पुरुषोत्तम पेंदोर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सहायक जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि आ.भीमराव केराम यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. शासनाने यावर तात्काळ पावले न उचलल्यास 'पिंपळगाव फाटा' येथे तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही सरपंच पेंदोर यांनी प्रशासनाला दिला आहे.

# मातृत्वाची क्षमता जपण्याच्या अर्जावर ३ आठवड्यांत निर्णय-उच्च न्यायालयाचे निर्देश

मुंबई/प्रतिनिधी-घटस्फोटाची प्रक्रिया सुरू असताना महिलेच्या भविष्यातील मातृत्वाची क्षमता जपण्याच्या अधिकाराशी संबंधित महत्त्वाच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने राष्ट्रीय सरोगसी व सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (ए.आर.टी.) बोर्डाला ३९ वर्षीय पुण्यातील महिलेच्या अर्जावर तीन आठवड्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३१ ऑगस्ट रोजी होणार आहे.

प्रभारी मुख्य न्यायाधीश रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत राज्य सरकारने संबंधित प्राधिकरणाकडे नियमानुसार अर्ज केल्यास त्यावर तातडीने विचार केला जाईल, असे न्यायालयाला सांगितले. त्यानंतर न्यायालयाने ए.आर.टी. बोर्डाला तीन आठवड्यांच्या आत अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले.याचिकेनुसार, संबंधित महिलेचे २०१६ मध्ये लग्न झाले होते. वैवाहिक संबंध बिघडल्यानंतर जून २०२० मध्ये तिने पतीविरुद्ध घरगुती हिंसाचार व छळाचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर ऑगस्ट २०२० मध्ये पुणे कुटुंब न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल करण्यात आली असून ती अद्याप प्रलंबित आहे.महिला सध्या ३९ वर्षांची असून वाढत्या वयामुळे तिची नैसर्गिक प्रजनन क्षमता कमी होत असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तिने भविष्यातील मातृत्वाची क्षमता जपण्यासाठी आवश्यक वैद्यकीय प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. मात्र, पतीच्या संमतीच्या अटीमुळे तिला ही प्रक्रिया करता येत नसल्याचा दावा तिने न्यायालयात केला.महिलेने असा आरोप केला आहे की, या प्रक्रियेसाठी संमती देण्याच्या बदल्यात पती सर्व वैवाहिक आणि फौजदारी खटले मागे घेण्यासाठी दबाव टाकत आहे. त्यामुळे पतीच्या संमतीची सक्ती तिच्या भविष्यात आई होण्याच्या अधिकारावर गदा आणत असल्याचे तिचे म्हणणे आहे. महिलेचे वकील सुशांत इंद्रजित सिंग यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना, वैवाहिक संबंध पूर्णपणे तुटलेले असताना आणि घटस्फोटाचा खटला अनेक वर्षांपासून प्रलंबित असताना केवळ पतीच्या संमतीअभावी महिलेला मातृत्वाची क्षमता जपण्याच्या संधीपासून वंचित ठेवता येणार नाही, असे सांगितले.

पान १ वरुन

## किनवटला जिल्हा व...

तसेच पिंपरी-चिंचवड (जि. पुणे) येथे विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्यासही मंत्रिमंडळाने हिरवा कँदील दिला.मंत्रिमंडळाच्या या निर्णयांमध्ये किनवटला मिळालेली नवीन न्यायालयांची मंजुरी हा नांदेड जिल्ह्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचा निर्णय मानला जात असून, त्यामुळे न्यायसेवा अधिक सुलभ आणि वेगवान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आंतरराष्ट्रीय तिरंदाजीत...

टीममध्येही रौप्य पदकाचे मानकरी ठरले. या आंतरराष्ट्रीय उत्तुंग भरारीत किनवटच्या ज्ञानेशने एक सुवर्ण इतिहास रचल्यामुळे सरस्वती महाविद्यालयाने तर शुभेच्छा दिल्या. परंतु सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असल्याने चेरले परिवाराने सर्वांचे आभार व्यक्त केले.

## 'गुंगी गुडिया'वादावरुन...

पक्षाने वापरू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसने या प्रकरणावर आक्रमक पवित्रा घेत पुण्यातील बालगंधर्व चौकात निषेध आंदोलनाची घोषणा केली आहे. काँग्रेसने तातडीने जाहीर माफी मागावी, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडले जाईल, असा इशारा राष्ट्रवादीच्या महिला आघाडीसह पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.'गुंगी गुडिया' या एका शब्दावरून सुरू झालेला वाद आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील थेट राजकीय संघर्षात परिवर्तित झाला असून, येत्या काही दिवसांत हा वाद आणखी चिघळण्याची चिन्हे आहेत.

## पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर...

असल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला. आंदोलना दरम्यान समाजबांधवांच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांच्याकडे तसेच वरिष्ठ प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करण्यात आले. पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांची बदली तातडीने रद्द करून त्यांना धर्माबाद येथेच नियोजित कार्यकाळ पूर्ण करण्याची संधी द्यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली. दरम्यान, मागणीची दखल न घेतल्यास भविष्यात धर्माबाद शहर बंद ठेवून अधिक तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला. या आंदोलनात विविध समाजांचे पदाधिकारी, व्यापारी, युवक आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४